# खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित
# मुलींचे वसतिगृह ( मु.जे.परिसर )
# सन 2013-14 चा वार्षिक अहवाल

---

मू.जे.महाविद्यालयाच्या परिसरातील मुलींच्या वसतिगृहात अहवाल वर्षात मू.जे.महाविदयालयाच्या एकुण 197 विदयार्थीनी व एकुण 3 प्राध्यापिका वास्तव्यास होत्या.

दि.21/07/13 रोजी आर्ट ऑफ लिव्हींग बाबत व्याख्यान आयोजित करण्यात आले.

मुलींच्या वसतिगृहामध्ये 9 सप्टेबंर 2013 ते 18 सप्टेंबर 2013 या कालावधी मध्ये गणेशोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.या कालावधीमध्ये वसतिगृहात रोज रात्री 7 ते 10 या वेळेत मनोरंजनात्मक व मुलींच्या कलागुणांना वाव देणा-या स्पर्धा घेण्यात आल्या.त्यात विजयी झालेल्या विद्यार्थीनींना पारितोषिके देण्यात आली.

दि.15 सप्टेंबर 2013 रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.

दि. 16 सप्टेबंर 2013 या दिवशी वसतिगृहाचे स्नेहसंमेलन “जल्लोष 2013“ मोठया उत्साहात पार पडले.

दि.05/10/13 ते 13/10/13 या कालावधीत वसतिगृहात नवरात्री निमित्त गरबा व दांडीयाचे आयोजन करण्यात आले.

दि.18/10/13 रोजी कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्यात आली.या दिवशी दुध वाटप करण्यात आले.

दि.17/01/14 रोजी सुनिल जोशी मुंबई 'ताडोबा तो मुबंई Tiger cycle walk' यांचे तर्फे Save Tiger व पर्यावरण या विषयावर Slide Show व Documentry दाखविण्यात आली व मुलींना माहीती देऊन मार्गदर्शन करण्यात आले.

दि.23/01/14 ते दि.10/02/14 या कालावधीमध्ये वसतिगृहातील मुलींच्या डोळयांची तपासणी करण्यात आली.

वसतिगृहातील मेस सोसायटी चालवित आहे. वसतिगृहातील मुलींना उच्च प्रतीचे, जीवन सत्व युक्त जेवण देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. मेस मधील अडीअडचणी सोडविण्यासाठी भोजनसमिती सदस्यांची निवड विद्यार्थीनीमधुन करण्यात येते .समिती सदस्यांची वेळोवेळी बैठक घेण्यात येते.

मेसमध्ये मुलींना गरम जेवण मिळावे यासाठी बेनमेरी बसविण्यात आली आहे. तसेच अन्न व्यवस्थित शिजावे म्हणुन Boiler बसविण्यात आले आहे.

मुलींच्या बाहेर येण्याजाण्यावर त्यांना भेटणा-यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तीन शिफ्टमध्ये सुरक्षा रक्षकाची नेमणुक करण्यात आली आहे त्याबाबत नोंद ठेवण्यात येते.

श्री.संजीव पाटील
मुलींचे वसतिगृह प्रमुख